# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:-०२०- २६१२३०६६/६७ वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


**दरपत्रक सूचना**

जा.क्र.मराप/भांडार/Income Tax /2023/6275

दिनांक :- 15/09/2023

प्रति,

----------------------

----------------------

----------------------

**विषय** :- आयकर विभाग, कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे निपटारा करणेकरिता सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत..

उपरोक्त विषयानुसार परिषदेस आयकर विभाग, कार्यालयाकडून [redacted] प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे निपटारा करणेसाठी **'सनदी लेखापाल'** यांची नियुक्ती करावयाची असल्याने बंद लिफाफ्यामध्ये खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रक मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे पोहचविण्याची अंतीम मुदत दि. 26/9/2023 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत आहे. यानंतर परिषदेस प्राप्त झालेली दपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

1. दरपत्रक बंद लिफाफ्यात असाव्यात व लिफाफ्यावर मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे नावे आयकर विभाग, कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे निपटारा करणेकरिता सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत असे नमूद करावे.
2. सदरचे सिलबंद लखोटा क्र.1 **तांत्रिक कागदपत्रे** - व लखोटा क्र.2 **वित्तीय दर**, दि. 26/9/2023 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्यमंडळ) भांबुर्डा, शिवाजीनगर, आघारकर इन्स्टिटयुट मागे, आगरकर रोड, पुणे - 04 येथे (दुसरा मजला, आवक-जावक शाखेत) कार्यालयात हस्तपोच सादर करण्यात यावी / देण्यात यावी.
3. दरपत्रकात सेवेसाठीचे दर वस्तु व सेवा (GST) इतर सर्व करासहित समाविष्ट करण्यात यावा.
4. सेवा पुरवठादाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.
5. आयकर विभाग, कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे निपटारा करणेकरिता सनदी लेखापाल नियुक्तीचा कालावधी कार्यादेश आदेशाच्या दिनांकापासून आयकर विभाग, कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे पूर्ण निपटारा होईपर्यंतच्या कालावधीसाठी असेल.
6. सनदी लेखापालाची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.
7. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी
8. **लखोटा क्र.1** मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
9. **लखोटा क्र.2** मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
10. दरपत्रके उघडण्याचा दिनांक शक्य असल्यास दि. 26/9/2023 रोजी सायंकाळी 5.00वा. किंवा परिषदेच्या सोईनुसार उघडण्यात येईल.
11. लखोटा क्र.1 लिफाफ्यामधील दर्शविलेली कागदपत्रे अपूर्ण असल्यास लखोटा क्र.2 (वित्तीय दर) उघडण्यात येणार नाही.
12. मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.
13. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.
14. दिलेल्या मुदतीत आपली दरपत्रके या कार्यालयास प्राप्त न झाल्यास वरील सर्व संपूर्ण अटी मान्य नाहीत असे समजण्यात येईल.
15. आयकर विभाग, कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या नोटीसींचे निपटारा करणेकरिता सनदी लेखापाल नियुक्तीच्या आवश्यक कामाचा तपशिल वित्तीय लखोटा क्र.2 मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार दरपत्रक सादर करावे.
16. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळावर www.mscepune.in उपलब्ध आहे.



Scanned by CamScanner

**लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे -**

दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावी.

1. ICAI कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र.
2. संस्थेचे/प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड.
3. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
4. ताळेबंद अहवाल AY 2021-22, AY 2022-23.
5. केंद्र शासन, राज्य शासनाच्या संस्थेमध्ये किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र व आवश्यक त्या छायांकित प्रती जोडण्यात यावे.
6. शासन अंगीकृत संस्थामध्ये संस्था काळ्या यादीमध्ये नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

**लखोटा क्र.2 वित्तीय दर-**

| अ. क्र. | कामाचा तपशिल | दर सर्व करांसहित (रुपये) |
|---|---|---|
| 1. | STAY APPLICATION | |
| 2. | ATTENDENCE | |
| 3. | ASSESSMENT FIRST SUBMISSIONS | |
| 4. | ASSESSMENT FURTHUR SUBMISSION | |
| 5. | APPEAL FILING | |
| 6. | APPEAL FURTHUR SUBMISSION | |
| 7. | APPEAL FIRST SUBMISSION | |
| 8. | REGULAR FIRST SUBMISSION | |
| 9. | REGULAR FURTHUR SUBMISSION | |
| 10. | OTHER IF REQUIRED | |

सदर कामासाठी भाग घेण्यासाठी इच्छूक संस्थांनी उपरोक्त निकष पूर्ण करीत असल्यास दरपत्रकासोबत कामाचा तपशिल तक्ता संस्थेंनी संस्थेच्या लेटरहेडवर नमूद करुन सीलबंद स्वतंत्र लखोटा क्र.1 व 2 सादर करण्यात यावे. टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोणतेही कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना राहतील.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

Scanned by CamScanner